# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 09/03/2020 (सोमवार)
# (दुपार)

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि.मी अंतरावर कुही  येथे दिनांक 09/03/2020 चे 00.30 वा. ते 04.35 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पो.शि देवेन्द्र विनायक बुटले, वय 27 वर्ष, नेमणुक पो.स्टे. कुही (पोलीस मदत केंद्र पाचगाव) हे पाचगाव चौकी येथे आपले कर्तव्यावर हजर असतांना नामे सौ. प्रियंका नंदकिशोर घोटेकर यांची तक्रार घेत असतांना अंदाजे 00.30 वा. दरम्यान आरोपी नामे– सुरज धनराज खोब्रागडे, वय 30 वर्ष, रा. उटी, ह. मु. नागपूर हा पोलीस चौकी पाचागव येथे आला व म्हणाला की, ''माझे वडीलांना तुम्ही खाली का बसविले त्यांना खुर्चिवर का बसविले नाही, मला चौकशी करून दया तुम्ही कशाची तक्रार घेता मी मिडीया बोलावतो' असे म्हणुन चौकीतील कार्यालयीन काम करीत असलेल्या टेबलावरील कागदपत्रे फेकफाक केले. यांनतर फिर्यादी हे गणवेशात असतांना फिर्यादीचे अंगावर धावुन गेला व कॉलर पकडली त्यांनीर चौकित हजर असलेले कुमरे मेजर व घुटके मेजर यांनी आरोपीच्या तावडीतुन फिर्यादीची सुटका केली. अशा प्रकारे यातील फिर्यादी गणवेशात पाचगाव चौकी येथे त्याचे कर्तव्यावर हजर असतांना आरोपीने त्याचे शासकिय काम करीत असतांना अडथडा निर्माण करून कॉलर पकडुन तु पाचगाव चौकी येथे कशी नौकरी करते ते पाहुन घेईन अशा धमकी दिली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी विरुध्द कलम 353,506,332 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. कमलेश सोनटक्के 9422644538 हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष<br>
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर